# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०८/०६/२०१९
## दि.०७/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ३५३/१९,भादविक ३५३,१४३,१४५,१४९,३२३ |
| **फिर्यादी** | विनायक जाधव,वय-४७ वर्षे,रा.बालाजीनगर,धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | पुणे महानगरपालिकेचे स्विकृत राजकीय पक्षाचे नगरसेवक व त्यांचे ७ ते ८ कार्यकर्ते (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०६/२०१९ रोजी सकाळी ११/३० वा. तळजाई टेकडी येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी नमुद वेळी तळजाई टेकडी येथे सोलर सिस्टिम बसविण्याचे कामाकरीता सर्व्हे करण्यासाठी रोहीत कंन्स्ट्रक्शन कडील लोक तळजाई टेकडी येथे गेले. त्यावेळी फिर्यादी व त्यांचे सहकारी सहकारनगर पोलीस स्टेशनला येवुन,तेथील पोलीस बंदोबस्ताची मागणी करण्याकरीता आले होते. त्यावेळी फिर्यादी यांना रोहीत कंन्स्ट्रक्शन ठेकेदार यांनी सांगितले की, आम्ही सर्व्हेचे काम करीत असताना,दोन अनोळखी इसम येवुन ठेकेदार यांचेशी वाद-विवाद करुन,याठिकाणी काम करु नक,परत इकडे येवु नका असे म्हणुन रोहीत विलास भंडारे यास हाताने मारहाण करुन निघुन गेले आहेत. त्यानंतर फिर्यादी व त्यांचे सहकारी उप-अभियंता असे त्याठिकाणी गेले असताना,पुणे महानगरपालिकेचे स्विकृत नगरसेवक व त्यांचे ७ ते ८ कार्यकर्ते यांनी फिर्यादी यांचेसमोर काही मुद्दे उपस्थित करुन,मी येथे काम करु देणार नाही,सदर कामाबाबत माझे मा.महापालिका आयुक्त सो. यांचेशी बोलणे झाले असुन,तुम्ही इथे काम करु नका असे सांगुन,सदर ठिकाणचे काम बंद करण्यास भाग पाडुन,फिर्यादी यांचेशी वाद घालुन,सदर ठिकाणचे काम करु देणार नाही असे म्हणुन त्यांच्या कार्यकत्यासह तेथेच थांबुन राहुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. ए.आर.पाटील ७५१७४८२८२८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २८८/१९,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२५ वर्षे,रा.रामानंद नगर,कोल्हापुर |
| **आरोपी** | दोन महिला व एक पुरूष (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे मार्च-२०१९ ते मे-२०१९ रोजीचे कालावधीत ब्राइट फ्युचर कन्सल्टन्सी प्लेसमेंट सर्व्हिस, शास्त्री कॉम्प्लेक्स,दुसरा मजला,मुकुंदनगर,स्वारगेट,पुणे |
| **तपशिल** | यातील दोन महिला व एक पुरूष यांनी संगनमत करून,फिर्यादी व त्यांचे इतर साक्षीदार यांना नमुद कालावधी मध्ये फिर्यादी यांचेकडुन ६०,०००/- रुपये घेवुन,तसेच इतर साक्षीदार १.राहुल हंडु यांचेकडुन ६०,०००/- रुपये २.महेश लगड यांचेकडुन ३५,०००/- रुपये ३.रिचा कुमारी यांचेकडुन ४०,०००/- रुपये ४.भाग्यश्री खतकल्ले यांचेकडुन ५०,०००/- रुपये असे रोख व चेकव्दारे एकुण २,४५,०००/- रक्कम घेवुन,त्यांना वेग-वेगळ्या कंपनी मध्ये नोकरीस लावतो असे सांगुन,फिर्यादी व साक्षीदार यांचेकडुन नमुद रक्कम घेवुन,त्यांना नोकरीस न लावता त्यांचीफसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. एस.एन.शेख ९६८९९३४२८६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २८५/१९,भादविक ३८४,३८६,३२३,५०६,क्रिमी. लॉ ॲम.क. ७ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५०,रा.गुलटेकडी,पुणे |
| **आरोपी** | फैजल उर्फ गट्टया,वय-२४,रा.४२७,इंदिरानगर,गुलटेकडी,पुणे (अटक) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०६/२०१९ रोजी २०/३० वा. इंदिरानगर,गुलटेकडी,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे दुकानात येवुन,त्यांचेकडे दरमहा १० हजार रूपये खंडणी स्वरूपात मागुन,त्यांचे कमरेला लपविलेला कोयता बाहेर काढुन,तो त्यांना दाखवुन, फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी देवुन,त्यांचे दुकानातील भिंतीला असलेल्या सामान ठेवायचे रॅकची काच फोडुन नुकसान करून,फिर्यादी यांना हाताने मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.सी.उसगांवकर ७३५०५४७००७ |

**<u>दि.०८/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ५३०/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | संदिप कौशिक,वय-३२,रा.चिखली,प्राधिकरण,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०६/२०१९ रोजी पहाटे ०१/०० वा. नॅशनल इन्श्युरन्स ॲकॅडमीचे थोडे पुढे सर्व्हीस रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे जेवण करुन त्यांचे राहते घरी जात असताना,नॅशनल इन्श्युरन्स ॲकॅडमीचे थोडे पुढे सर्व्हीस रोडवर लघुशंकेसाठी थांबले असताना,रस्त्याचे विरुध्द दिशेने यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून पत्ता विचारण्याचे बहाण्याने त्यांचेजवळ येवुन, त्यानंतर त्यांनी फिर्यादी यांची मोटार सायकल मागितली,त्यांनी त्यास त्यास नकार दिला असता,त्यांनी फिर्यादीस पिस्टल सदृश्य वस्तु दाखविली. त्यामुळे फिर्यादी हे घाबरुन रस्त्याचे विरुध्द दिशेस पळाले. तेव्हा सदर इसमांनी फिर्यादी यांची मोटार सायकल नं.एमएच/१४/ एफए/८०२६ ही पिस्टल सारख्या सदृश्य वस्तुचा धाक दाखवुन चावीसह जबरदस्तीने चोरुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.व्हि.दोडमिसे ९५०३७५८२८४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**